# मिरा भाईंदर महानगरपालिका

Mira Bhayandar @2047 Innovate. Connect. Prosper

दिनांक 13/02/2024

## // इतिवृत्तांत //

**श्री. संजय श्रीपतराव काटकर**, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दि.13/2/2024 रोजी सकाळी 11.30 वा. आयुक्त कार्यालय, सभागृह येथे सर्व विभाग प्रमुख/ खाते प्रमुख यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

**बैठकी दरम्यान मा. आयुक्तांनी दिलेल्या सूचना/निर्देश खालील प्रमाणे-**

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| १. | One click attendance. | श्री. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त<br>श्री. रवि पवार, उपायुक्त | निविदा प्रक्रिया पुर्ण करुन त्वरीत अंमलबजावणी करावी. | दि.26/02/24 |
| २. | परिवहन बस स्टँड जाहिरात व दुरुस्ती. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (परिवहन) | सर्वेक्षण करावे. जेथे दुरुस्ती करावयाची आहे ते स्टँड त्वरीत दुरुस्त करुन घ्यावेत. तसा प्रस्ताव सादर करावा. आवश्यकता नसेल तेथील बस स्टँड काढून घ्यावेत. प्रवाशांना त्यामुळे त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी. | दि.26/02/24 |
| ३. | जप्त केलेल्या मालमत्तांचा लिलाव. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (कर)<br>श्री. संजय शिंदे, उपायुक्त (कर) | जप्ती करावयाच्या मालमत्तांचे मुल्यांकन करुन घ्यावे. | दि.19/02/24 |
| ४. | कर व लेखा विभागातील वसुलीत आढळून येणारी तफावत (ताळमेळ पत्रक तयार करणे). | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (कर)<br>डॉ. कालिदास जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी | कर व लेखा विभाग यांनी समन्वय साधून लेखा तफावत दुर करावी. प्रत्येक महिन्याला ताळमेळ पत्रक तयार करावे. | नियमित |
| ५. | दिव्यांग व महापालिका कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या घरा बाबत. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (मा.व्य.) | महापालिका कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या घरांसाठी मा. जिल्हाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त करुन घ्यावेत.<br>तसेच दिव्यांगांना द्यावयाचे घरासाठी रु.1 रजिस्ट्रेशन फी भरणेबाबतच्या प्रस्तावास मुद्रांक | दि.26/02/24 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | शुल्क अधिकारी यांचेकडून मंजूरी प्राप्त करुन घेणे. | |
| ६. | चौकशी अधिकारी यांनी दिलेले निकाल. (त्याची पडताळणी) | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.प्र.) | चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या निकालाची पडताळणी करुन अहवाल द्यावा. (लेखापरिक्षण आक्षेपाबाबत शासनास अहवाल सादर करावा.) | दि.19/02/24 |
| ७. | महापालिका आस्थापनांमधील सर्व अडगळ दुर करणे. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (सा.प्र.) | सर्व विभागप्रमुखांनी आपल्या अधिनस्त विभागातील अडगळ काढून घ्यावी. अडगळीची विल्हेवाट लावण्यासाठी नेमलेल्या कमिटीने मुल्यमापन करणे. शनिवार दि.17/02/24 रोजी सर्व महापालिका आस्थापनांमध्ये सखोल स्वच्छतेचा कार्यक्रम राबविणे. | दि.19/2/24 |
| ८. | महापालिका मालकीचे मार्केट दुरुस्ती/वापर — 5% दिव्यांगाना देणे. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त (मा.व्य.) | मार्केट मधील दुरुस्तीची कामे करुन घेणे.<br>रस्त्यावरील फेरीवाल्यांना मनपा मार्केट मध्ये स्थलांतरीत करणे. | दि.26/02/24 |
| ९. | घनकचरा वर्गीकरण करण्यासाठीचा तयार करण्यात आलेला क्यु आर कोड मध्ये कर व पाणी पुरवठा बीलाचा समावेश करणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (कर)<br>श्री. दिपक खांबित, शहर अभियंता<br>श्री. रवि पवार, उपायुक्त (घन कचरा व्यवस्था.) | कर विभाग व पाणी पुरवठा विभाग यांनी आपला डाटा सुधारणेसह श्री. रवि पवार, उपायुक्त यांचेकडे उपलब्ध करुन द्यावा. | दि.26/02/24 |
| १०. | जॉब चार्ट प्रमाणे कामाचे मुल्यांकन. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | उर्वरित सर्व विभागांनी आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांचा जॉब चार्ट मुल्यांकनासाठी अतिरिक्त आयुक्त (सा.प्र.) यांचेकडे उपलब्ध करुन द्यावा.<br>जे अधिकारी 2 दिवसात माहिती उपलब्ध करुन देणार नाहीत त्यांना नोटीस देवून त्यांचेविरुध्द शास्तीसाठीचा प्रस्ताव अतिरिक्त | दि.19/02/24 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| ११. | सुरक्षा रक्षकांच्या कामाचे स्वरुप ठरविणे बाबत. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | प्रत्येक खाते प्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सुरक्षा रक्षकांची बैठक घेवून त्यांना त्यांचा जॉब चार्ट समजावून सांगावा. | दि.19/02/24 |
| १२. | मिरा भाईंदर शाळांमधील राज्यस्तरीय खेळाडूंना पोषण आहार देणे. (गोषवारा) | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (शिक्षण) | निविदा प्रक्रिया पार पाडावी | |
| १३. | मनपा शाळेतील खेळाडूंना आर्थिक वर्षात स्पोर्टस् शू उपलब्ध करुन देणे बाबत (गोषवारा) | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (शिक्षण) | स्पोर्टस् शू खरेदी करुन देण्यात यावेत. | दि.19/02/24 |
| १४. | बीएसयुपी इमारतीमधील समस्या. | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | स्थानिक रहिवाशी अथवा महापालिकेने संस्था नेमून बीएसयुपी इमारतीच्या मेन्टेनन्सचे काम देण्याबाबतचे धोरण निश्चित करावे. | दि.19/02/24 |
| १५. | ठिकठिकाणी बंद पडलेले कीऑस्क उचलून घेणे. | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | मुल्यांकन करुन विल्हेवाट लावावी. | दि.19/02/24 |
| १६. | सर्व मालमत्तांचे एनर्जी ऑडीट/स्ट्रक्चरल ऑडीट. | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | लवकरात लवकर ऑडीट करुन पुर्ण होईल यासाठी प्रयत्न करावेत. | दि.29/02/24 |
| १७. | हायमास्ट शेजारी असलेले लाईट पोल. | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | एकदा नव्याने सर्वेक्षण करुन घ्यावा. हायमास्ट शेजारी लाईट पोल राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. | दि.19/02/24 |
| १८. | पाणपोई सेवा भावी संस्थांना चालविण्यासाठी देणे. | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | सेवा भावी संस्था पाणपोई चालविण्यासाठी इच्छुक नसल्यास महापालिकेने संस्था नेमावी. त्यासाठी प्रक्रिया सुरु करावी. | दि.19/02/24 |
| १९. | **फायर ऑडीट** महापालिका | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | महापालिकेच्या आस्थापनांचे फायर ऑडीट झाले असून खाजगी आस्थापनांचे काही प्रमाणात | दि.29/02/24 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | कार्यालय/शाळा/खाजगी क्लासेस | श्री. प्रकाश बोराडे, मुख्य अग्निशमन अधिकारी | फायर ऑडीट होणे बाकी असल्याचे उपायुक्त (मु.) यांनी सांगितले. उर्वरित खाजगी आस्थापनांचे लवकरात लवकर फायर ऑडीट करुन घ्यावे. | |
| २०. | शहरातील डासांचे वाढते प्रमाण. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (सा.आ.) | डास उत्पतीच्या जागा निश्चित करुन त्या जागा मालकास सुचना द्याव्यात. डास निर्मुलनासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. | |
| २१. | शहरात दर्शनी भागी प्रदुषण दर्शक फलक लावणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (पर्यावरण) | लवकरात लवकर निविदा प्रक्रिया पुर्ण करावी. | |
| २२. | शालेय पोषण आहार (खिचडी). | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (शिक्षण)<br>श्रीम. सोनाली मातेकर, शिक्षणाधिकारी | सर्व पालक अधिकारी यांना आपला अहवाल आजच नाविन्यता कक्षास उपलब्ध करुन द्यावा. श्री. विलास गीते यांनी सर्व माहिती संकलित करुन आयुक्तांकडे अवलोकनार्थ सादर करावी. | दि.19/02/24 |
| २३. | सेवानिवृत्त शिक्षकांचे नियतकालीन निवृत्ती वेतन व अनुषांगिक लाभ देणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (शिक्षण)<br>श्रीम. सोनाली मातेकर, शिक्षणाधिकारी | शिक्षण विभागास कायम स्वरुपी कर्मचारी उपलब्ध करुन देणे. | |
| २४. | निवारा शाळा स्थलांतरीत करणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (शिक्षण)<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | निवारा शाळेतील मुले पेणकर पाडा येथील अदिवासी विश्राम गृहाच्या जागेत स्थलांतरीत करता येईल का याकरिता आदिवासी विकास विभागाशी संपर्क करावा. | दि.19/02/24 |
| २५. | इंदिरा गांधी रुग्णालयात डायलिसीस मशीन बसविणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (सार्व. आ.)<br>डॉ. नंदकिशोर लहाने, प्र.मु.वै.आ.अ. | लवकरात लवकर डायलिसीस मशीन बसविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. | |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| २६. | मालमत्ता रजिस्टर तयार करून माहिती सादर करणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त् (मिळकत) | मालमत्ता रजिस्टर अद्ययावत करावे. तसेच त्यांच्या संगणकात नोंदी घ्याव्यात. त्या-त्या मालमत्ता करीता पालक अधिकारी निश्चीत करावेत. तसा प्रस्ताव आयुक्तांकडे सादर करावा. | |
| २७. | नवीन जागेवर पे ॲण्ड पार्क सुरु करणे. | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (P&P)<br>श्री. शहर अभियंता, शहर अभियंता | जेपी इन्फ्रा समोरी मोठया रस्त्यावर येत्या सोमवार पासून अनधिकृत फेरीवाला नियंत्रण पथकामार्फत पे ॲण्ड पार्कचे पैसे वसुल करावेत. बांधकाम विभागाने वाहने पार्क करण्यासाठी पट्टे मारुन द्यावेत. | दि.19/02/24 |
| २८. | झाडांच्या पालापाचोळा व फांद्यांवरील प्रक्रिया केंद्र. | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (उद्यान) | लवकरात लवकर निविदा प्रक्रिया पुर्ण करावी. | |
| २९. | गार्डन मधील तुटलेली खेळणी/साहित्य | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त (उद्यान) | लवकरात लवकर निविदा प्रक्रिया पुर्ण करावी. | |
| ३०. | रिक्षा चालकांना देण्यात आलेल्या क्रमांकावरील तक्रारी. | श्री. स्वप्निल सावंत, सहा. आयुक्त (आप. व्यव.) | रिक्षा चालकांना देण्यात आलेल्या क्रमांकावरील तक्रारींची दखल घेवून संबंधित विभागांनी नियमानुसार त्वरीत कार्यवाही करावी. | |
| ३१. | महापालिका शाळेतील पाण्याच्या टाक्या साफ-सफाई करणे व शाळेत बसविलेली पाणी शुध्दीकरण यंत्र बंद असणे (1/2/24 रोजीच्या बैठकीतील सुचना) | श्री. संभाजी पानपट्टे, अति.आयुक्त<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | प्रत्येक 3 महिन्याला पाण्याची टाकी व जल शुध्दीकरण यंत्राची साफ-सफाई करीता निविदा काढून संस्था नियुक्त करावी. | दि.29/02/24 |
| ३२. | महापालिका अंतरशालेय सांस्कृतिक स्पर्धा. | श्री. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त<br>श्री. संजय शिंदे, उपायुक्त | महापालिका वर्धापन दिनाच्या निमित्ताने अंतरशालेय स्पर्धा घेण्याचे नियोजन करावे. | दि.28/02/24 |
| ३३. | क. अभियंता नेमणेबाबत निविदा काढणे. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | शहर अभियंता यांचे लेखी अभिप्राय घेवून पुढील प्रक्रिया सुरु करावी. | दि.19/02/24 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता (बांध.) | | |
| ३४. | मुर्धा येथील जेष्ठ नागरीकांना जागा उपलब्ध करुन देणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (मिळकत) | जेष्ठ नागरीकांना जागा उपलब्ध करुन दिल्याचे बैठकीत उपायुक्त (मिळकत) यांनी सुचित केले. | |
| ३५. | सफाई कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटी देणे. | श्री. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त (घन. व्यवस्था) | लेखा विभागाकडे प्रस्ताव सादर केला असल्याचे अति. आयुक्त (घन. व्यवस्था.) यांनी सांगितले.<br>मु.ले.अ. यांनी तपासून कार्यवाही करावी. | |
| ३६. | मनपा अधिकाऱ्यांना शाळा दत्तक देणे. | श्री. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त (शिक्षण) | महापालिका शाळांचा/ शिक्षणाचा दर्जा सुधारणे, मुलांना सोयी-सुविधा वेळेत उपलब्ध करुन देणे. करिता महापालिका अधिकाऱ्यांना शाळा दत्तक देण्यात याव्यात तसे लेखी आदेश काढावेत.<br>गुणवत्ता वाढीसंदर्भात पालक अधिकारी व शिक्षकांची कार्यशाळा आयोजित करावी. | दि.19/02/24 |
| ३७. | 15 वित्त आयोग अंतर्गत नागरी आरोग्यवर्धीनी केंद्र सुरु करणे. (असमाधान काम असल्याचे आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे पत्र)<br>15 फेब्रुवारी 2024 मुदत | डॉ. संभाजी पानपटटे, अति आयुक्त (सा.आ.)<br>डॉ. दुधभाते, मु.आ.अधि. | महापालिका कार्यक्षेत्र व आरोग्य केंद्र यांची संख्या तसेच मिरा भाईंदरचे शहरीकरण झाले असून प्रत्येक इमारतीमध्ये खाजगी दवाखाने सुरु असून नागरीक त्यांचा लाभ घेत असल्याने अधिकचे आरोग्य केंद्र सुरु करणे शक्य होणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी बैठकीत सुचित केले. त्यानुसार आरोग्यवर्धिनी केंद्रांबाबत शासनाकडे फेर प्रस्ताव पाठवावा. | दि.16/02/24 |
| ३८. | रुग्णालयाच्या बाहेर दरांची यादी लावणे. कोव्हीड काळात शासनाचे आदेश होते | डॉ. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त (सार्व. आरोग्य) | सदरचे धोरण हे कोरोना कालावधीसाठीच होते. सद्या अशी कोणतेही शासन आदेश नसल्याचे अतिरिक्त आयुक्त | |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | (नियमातील तरतुदी तपासणे.) | | | |
| ३९. | सेवा करारावर घेतलेल्या अधिकारांच्या कामाचा आढावा | श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त | अधिकारी/कर्मचारी निहाय मुल्यमापन अहवाल सादर करावा. | |
| ४०. | न्यायालयीन प्रकरणात वकीलांना माहिती उपलब्ध करुन देणेबाबत. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.)<br>श्रीम. सई वडके, विधी अधिकारी<br>सर्व प्रभाग अधिकारी | विधी अधिकारी यांनी न्यायालयात दावा लढविण्यासाठी नियुक्त केलेल्या वकीलांना प्रत्येक प्रभाग अधिकारी यांनी संपर्क करुन न्यायालयीन कामकाजासाठी माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे आदेश उपायुक्त (मु.) यांनी निर्गमित करावेत. न्यायालयीन निकालांची अंमलबजावणी करण्यामध्ये होणारा विलंब व कसूर हा महापालिका व जनतेच्या हिताचा नसून यासाठी पर्यवेक्षण पध्दती निश्चित करण्यात यावी. | दि.16/02/24 |
| ४१. | 31 मार्च 2024 पर्यंत पुर्ण करावयाची कामे. | सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख | शासन निधीतील कामे, आयुक्तांनी आदेशित केलेली कामे ही दि.31 मार्च 2024 पर्यंत पूर्ण होतील याची दखल घ्यावी. कोणताही निधी अखर्चित राहून शासनाकडे परत जाणार नाही याची संबंधित अधिकारी यांनी दखल घ्यावी. तसेच पर्यवेक्षण पध्दती निश्चित करण्यात यावी. | |
| ४२. | नागरीकांच्या पत्रांना उत्तरे न देणेबाबत वाढत्या तक्रारी. | संबंधित सर्व खाते प्रमुख | शासन, लोकप्रतिनिधी व न्यायालयीन प्रकरणे, नागरीक यांच्या पत्रांना वेळेत उत्तरे देण्यात यावीत व पर्यवेक्षण पध्दती निश्चित करण्यात यावी. | नियमित |
| ४३. | संडे गार्डन करीता नाविन्यता आणण्यासाठी सुचना. | सर्व विभाग प्रमुख | संडे गार्डन या संकल्पेतून सुरु असलेल्या उपक्रमाची दि.28/02/24 रोजी सांगता होणार आहे. या दिवशी या उपक्रमात नाविन्यता येण्यासाठी इव्हेंट | दि.19/02/24 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | मॅनेजमेंटचा सहभाग घ्यावा. त्याची प्रसिध्दी सर्व जेष्ठ नागरीक केंद्र व उद्यानात करावी. | |
| ४४. | धारावी जंजीरे किल्ल्यावर इतिहास कालीन तोफ व शिला फलक बसविणे बाबत मा. श्रीम. गीता जैन याची मागणी | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता | धारावी जंजीरे किल्ल्याचे संवर्धनाचे काम सुरु असल्याने लोकसहभागातून इतिहास कालीन तोफ व शिला फलक तद्नंतर स्थलांतरीत करुन बसविणे योग्य राहिल असे शहर अभियंता यांनी बैठकीत सुचित केले. त्यानुसार कार्यवाही करावी. | |
| ४५. | नाटय सरावासाठी जागेची मागणी. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (मिळकत) | नाटयगृह अथवा बौध्द विहार येथे नाटय सरावासाठी जागा उपलब्ध करुन द्याव्यात. त्यासाठी डिजीटल प्लॅटफॉर्म निर्माण करण्यात यावा. | दि.19/02/24 |
| ४६. | महापालिका सुलभ शौचालय विना मोबदला चालविण्यासाठी देण्याबाबत सफाई कर्मचाऱ्यांचे मागणी पत्र. | श्री. रवि पवार, उपायुक्त (घन. व्यव.) | प्रस्ताव तपासून सादर करा. | दि.16/02/24 |
| ४७. | छ. शिवाजी महाराज जयंती साजरी करणे. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | छ. शिवाजी महाराज जयंती सुयोग्य नियोजन करुन साजरी करावी. | दि.19/02/24 |
| ४८. | महापालिका वर्धापन दिन साजरा करणे. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | महापालिका अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सहभागातून वर्धापन दिन साजरा करावा. | दि.28/02/24 |
| ४९. | पशु वैद्यकिय दवाखान्यातील घाण रस्त्यावर येणे. | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता (बांध) | घाण पाण्याचा निचरा योग्यरित्या होण्यासाठी बांधकाम विभागाने आवश्यकती कार्यवाही करावी. | दि.29/02/24 |
| ५०. | मलनि:सारण वाहिन्यांतील घाण पाणी रस्त्यावर येणे. | श्री. शरद नानेगावकर, कार्य. अभि. | मलनि:सारण वाहिन्यांची देखभाल, पूर्व तपासणी, देखरेख, दुरुस्ती यासाठी डिजीटल | दि.26/02/24 |

| अ. क्र. | विषय. | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| | | | होत आहेत त्यांची तपासणी करुन योग्य उपाययोजना कराव्यात. | |
| ५१. | परवाना देण्याचे अधिकार. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त | सद्य स्थितीत प्रभाग अधिकारी व परवाना विभागाकडून परवाना दिले जातात. यामुळे वसुलीमध्ये संभ्रम निर्माण होतो. करिता सर्व अर्ज ऑनलाईन स्विकारुन परवानगी द्यावी. (RTS अंतर्गत) सर्व प्रकारचे परवान्यांच्या नोंदी एकाच डिजीटल प्लॅटफॉर्मवर करण्यात याव्यात. | नियमित |
| ५२. | माघी गणेशोत्सव विसर्जन तयारी. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.)<br>श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता (बांधकाम) | दरवर्षी प्रमाणे माघी गणेशोत्सव विसर्जनाची तयारी करावी. नियोजन करावे. | दि.14/02/24 |
| ५३. | पंतप्रधान विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना. | श्रीम. कल्पिता पिंपळे, उपायुक्त<br>श्रीम. दिपाली पोवार, समाज विकास अधिकारी | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, ठाणे यांचे पत्र दि.08/02/24<br>मनपा प्रभाग निहाय आलेले अर्ज (22) ची दखल घेवून आवश्यक कार्यवाही करावी. | दि.19/02/24 |
| ५४. | कामगारांचे वेतन | सर्व खाते प्रमुख | जे ठेकेदार कर्मचाऱ्यांना 10 तारखेपर्यंत वेतन अदा करीत नाहीत त्यांना नोटीस देण्यात याव्यात.<br>कामगारांना वेळेत वेतन अदा न होणे ही बाब गंभीर असून विभागप्रमुखांची वारंवार सुचना देवूनही दिसून येणारी उदासिनता गंभीर आहे. वेळेत वेतन अदा न करणाऱ्या कंत्राटदारांना दर महिन्याच्या 12 तारखेला नोटीस देणे, कंत्राटामधील अटी-शर्तीचा वारंवार भंग होत असल्यामुळे कंत्राट रद्द करणे इ. कामे विभागप्रमुखांची जबाबदारी आहे. | नियमित |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| ५५. | 10 वी / 12 वी परिक्षा | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता | परिक्षा केंद्रासमोर रस्ते खोदाई केलेली आहे तेथे बॅरिकेटींग करणे. | दि.26/02/24 |
| ५६. | शासकीय कामकाजामध्ये NIC च्या ई-मेलचा वापर करणे. दि.7/2/2024 रोजीचा शासन आदेश | सर्व विभागप्रमुख | शासन आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. | दि.26/02/24 |
| ५७. | महापालिकेच्या सर्व प्रकल्पांचे ऑडीट करणे. | श्री. सुधीर नाकाडी, मुलेप. | महापालिकेचे सर्व प्रकल्प, मालमत्ता यांचे संचालनासाठी येणारा खर्च याचे लेखापरिक्षण करुन अहवाल तयार करावा. | दि.29/02/24 |
| ५८. | प्रयोग शाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन. | श्री. संभाजी पानपट्टे, अति. आयुक्त (सार्व. आ.) | सर्व कर्मचाऱ्यांचे वेळेत वेतन होईल याची दखल घ्यावी. जे ठेकेदार वेळेत वेतन देणार नाही त्यांना नोटीस बजावण्यात याव्यात. | दि.16/02/24 |
| ५९. | अग्निशमन वाहनांची दुरुस्ती व निगा बाबत. | श्री. मारुती गायकवाड, उपायुक्त (मु.) | डीप क्लीन ड्राईव्ह दरम्यान मनपा मालकीची वाहने ही देखभाल दुरुस्ती अभावी कमी कार्यक्षमतेने कार्य करत असताना आढळून आली. देखभाल दुरुस्तीची जबाबदारी निश्चित करावी. डिजीटल प्लॅटफॉर्म विकसित करावा.<br>अत्यावश्यक सेवेतील सर्व वाहने नेहमी सुस्थितीत रहातील याची व्यक्तिशः दखल घ्यावी. | नियमित |
| ६०. | सेल्फी पॉईंट वरील माजी सदस्यांच्या नावात एकसारखे पणा आणण्याबाबत. | श्री. दिपक खांबीत, शहर अभियंता (बांध.) | स्थळ पाहणीत काही माजी सदस्यांच्या नावाची अक्षरे पडलेली आहेत. काहींचे अक्षरांचे प्रमाण छोटे/मोठे असल्याचे दिसून आले यामध्ये एक समानता आणण्यासाठी धोरण निश्चित करावे. | दि.16/02/24 |

| अ. क्र. | विषय | अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव | आयुक्तांचे निर्देश | कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| ६१. | नविनता कक्षाचा जॉब् चार्ट तयार करणे. | श्री. संजय शिंदे, उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान) | नाविन्यता कक्षासाठी घेतलेले अधिकारी यांचा संबंधित विभाग प्रमुख/खाते प्रमुख यांनी आढावा घ्यावा. त्यांची योग्यता तपासावी. तद्नंतर त्यांना जॉब चार्ट तयार करुन द्यावा.<br>सदर विभागाचे कामकाज हे थेट उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान) यांचे मार्फत आयुक्तांकडे राहिल. तसे आदेश निर्गमित करावेत. | दि.16/02/24 |
| ६२. | दिनांक 9/10 तारखेला आयोजित MBMC@2047 कार्यक्रमाबाबत अधिकारी यांचे निरिक्षण व अभिप्राय. | सर्व विभाग/खाते प्रमुख | MBMC@2047 प्रमाणे प्रत्येक महिन्याला एक व्याख्यान माला आयोजित करावी असे सर्व अधिकारी यांनी सुचविले. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त (सा.प्र.) यांनी अंमलबजावणी करावी. | |

उपरोक्त सुचनांची विहीत मुदतीत अंमलबजावणी होईल याची संबंधित अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी. पुढील बैठकीत या विषयांचा आढावा घेण्यात येईल.

(**संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**सर्व संबंधित अधिकारी**
मिरा भाईंदर महानगरपालिका.